# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहिर सूचना

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१८/२१६

दिनांक : 8 FEB 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :- या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/ २०१८/८, दि. ०२.०१.२०१८

विषयांकीत जाहिर सुचनेस अनुसरून कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका (पीजीडीएम) सुरू करणे तसेच विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एम.सी.ए., एच.एम.सी.टी अभ्यासक्रमाच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या खालील प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावरुन सुनावण्या घेण्यात येणार आहेत.

- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एचएमसीटी व एमसीए अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका संस्था सुरू करणे.
- विद्यमान संस्था बंद करणे, विद्यमान संस्थेच्या साईट /लोकेशन मध्ये बदल करणे.
- पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट.
- पीजीडीएम कोर्स शिकविणा-या मॅनेजमेंट संस्थाचे रुपांतर एमबीए कोर्समध्ये करणे.
- गत शैक्षणिक वर्षाच्या खंडानंतर मान्यते पुढे चालू ठेवणे/ गत शैक्षणिक वर्षात शिखर परिषदेमार्फत थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे.
- एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे.
- विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे / सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.(अेआयसीटीईच्या मानकांनुसार तुकडी पुर्ण करणारे प्रस्ताव वगळून)
- विद्यमान संस्थेत अतिरीक्त इंडीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरू करणे, पदविका व पदवी संस्थेत NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे.
- विद्यमान संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमाचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे.
- विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरू करणे व याउलट करणे
- ओसीआय / पीआयओ/ परदेशी नागरीक/आखाती देशातीत भारतीय कर्मचा-यांची मुले यांच्यासाठी नव्याने अधिसंख्या जागा सुरू करणे (मान्यतेस विस्ताराचे (EoA) वगळून)
- अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी / मुलींसाठी नव्याने जागा ठेवण्यास सुरूवात करणे (मान्यतेस विस्ताराचे (EoA) वगळून)

२. सुनावणीचे वेळापत्रक खालील प्रमाणे असून संबंधित संस्थानी त्यानुसार वरील प्रस्तावांच्या सुनावणीकरीता या संचालनालयाच्या समिती सभागृहात उपस्थित राहवे.

| अ.क्र. | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय कार्यक्षेत्र | सुनावणीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय पुणे<br>नवीन संस्थांचे प्रस्ताव ------<br>विद्यमान संस्थाचे प्रस्ताव ------- | <br>दि.१५.०२.२०१८ रोजी- सकाळी १०.३० वाजता<br>दि. १५.०२.२०१८ रोजी- दुपारी १२.०० वाजता |
| २ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय नाशिक | दि.१६.०२.२०१८ रोजी- सकाळी १०.३० वाजता |
| ३ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय मुंबई | दि. १६.०२.२०१८ रोजी- दुपारी ०२.०० वाजता |
| २ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय नागपूर | दि. २०.०२.२०१८ रोजी-सकाळी १०.३० वाजता |
| ३ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती | दि. २०.०२.२०१८ रोजी- दुपारी १२.०० वाजता |
| २. | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय औरंगाबाद | दि. २०.०२.२०१८ रोजी - दुपारी ०२.०० वाजता |

३. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन संस्था सुरू करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुनावणीस येतांना संबंधित संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रतीसह संपुर्ण प्रस्ताव (अर्जात भरलेल्या माहितीच्या पृष्ठर्थ मुळ कागदपत्रे) नोंदणी शुल्क भरल्याची पावतीसह संस्थेचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या जबाबदार व्यक्तींनी (लेखी प्राधिकारपत्रासह) व्यक्तीशः सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

४. विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी उपरोक्त नमूद केल्यानुसार सुनावणीस येतांना संदर्भीन जाहिर सुचनेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद कागदपत्रांचे २ संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच AICTE यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१८-१९ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह प्राचार्यांनी व्यक्तीशः सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आगपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या संस्थाना वरील सुनावण्यांच्या वेळापत्राकाची माहिती त्यांचेस्तरावरुन कळविण्यात यावी.

२) सर्व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये

३) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.